**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या आयात शुल्कात कपात
- राज्याची मंत्रिमंडळ उपसमिती दुष्काळसदृश स्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेणार असल्याची महसूलमंत्र्यांची माहिती
- मध्यप्रदेश सरकारचा लता मंगेशकर राष्ट्रीय पुरस्कार प्रसिद्ध संगीतकार शंतनू मोईत्रा यांना जाहीर

**आणि**

- आशियाई क्रीडास्पर्धांमधे १५ पदकांची कमाई करून भारत १३व्या स्थानावर

**<><><><><>**

केंद्र सरकारनं विविध प्रकारच्या खाद्य तेलांवरच्या मूलभूत आयात शुल्कात कपात केली आहे, त्यामुळं तेलाच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे. कच्चा सूर्यफुल तेलावर आता १० ऐवजी शून्य टक्के, कच्च्या सोयाबीन तेलावर आणि कच्च्या पाम तेलावर आता १० ऐवजी ५ टक्के मूलभूत आयात शुल्क लागेल. या दरकपातीचा सर्व लाभ ग्राहकांना मिळेल यासाठी सर्व खबरदारी घेण्याचे आदेश केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयानं खाद्यतेल उद्योगातल्या सर्व कंपन्यांना दिले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकीर्दीला २५ वर्षं पूर्ण होत आहेत. ‘जनसेवेतून देशसेवा हा मंत्र आणि सतत समर्पणभावाचा’ हा प्रवास आहे. सेवा आणि सुशासन या सूत्रांचा अवलंब करत २०४७पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साकार करण्यासाठी सरकार सातत्यानं काम करत आहे. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडत आहेत. या विशेष मालिकेत आज आपण ऐकणार आहोत, अंतराळ क्षेत्रात भारताने बजावलेल्या कामगिरीबाबत …

**होल्ड व्हीसी**

*(विज्ञान आणि तंत्रज्ञानातल्या प्रगतीमुळे मानवाने अवकाशाची लांबीरुंदी मोजण्याचं मनावर घेतलं आहे. अंतराळात प्रगत देशांची स्पर्धा सुरु असताना भारतही मागे राहिला नाही. विशेषतः गेल्या काही वर्षात भारताने महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. मंगळयान २०१४ अतिशय कमी संसाधनांचा वापर करत, अतिशय कमी खर्चात भारताने मंगळयान मोहीम यशस्वी केली. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इसरो मंगळाच्या कक्षेत यान पोहोचवणारी जगातली चौथी संस्था ठरली. साऱ्या जगाचं लक्ष वेधून घेणारी ही मोहीम २३ सप्टेंबर २०१४ रोजी फत्ते झाली. त्यानंतर एकामागोमाग एक यशाची शिखरं पादाक्रांत करत इसरोची यशोगाथा अविरत पुढे जात आहे. चांद्रयान -२ मोहिमेअंतर्गत २२ जुलै २०१९ रोजी विक्रम लँडर आणि प्रज्ञान - रोव्हर चंद्रावर पोहोचले, या मोहिमेत सॉफ्ट लँडिंगमधे अपयश आलं मात्र चंद्रावरच्या पर्यावरणाची महत्त्वाची माहिती चांद्रयान - २ ने मिळवली. सॉफ्ट लँडींगचं अपुरं उद्दिष्ट चांद्रयान - ३ ने पूर्ण केलं. १४ जून २०२३ रोजी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडर उतरवणारा जगातला पहिला देश हा मान भारताने मिळवला. ॲक्सिओम मोहिमेतून कॅप्टन शुभांशु शुक्ला हा भारतीय अंतराळवीर अवकाशात सफर करुन आला. गगन यान हा भारताचा आणखी एक महत्त्वाकांक्षी अंतराळ प्रकल्प आहे.*

*सरकारी पातळीवर अवकाश क्षेत्रासाठी आणखी एक महत्त्वाची घटना झाली, ती म्हणजे खासगी उद्योगांचा अवकाश क्षेत्रात प्रवेश. खासगी उद्योगांसाठी तसंच स्टार्ट अप उद्योगांसाठी या क्षेत्रात प्रचंड संधी असून देशातल्या प्रतिभेला आणि नवोन्मेषाला यामुळे चालना मिळेल.)*

**<><><><><>**

पावसाच्या अभावाचा फटका बसलेल्या भागात उपाययोजना निश्चित करण्यासाठी नेमलेली ११ सदस्यीय मंत्रिमंडळ उपसमिती प्रत्यक्ष स्थितीचा आढावा घेणार असल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. नागपूरमधे आज ते वार्ताहरांशी बोलत होते. दर मंगळवारी उपसमितीची बैठक होणार असल्याचं ते म्हणाले. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या मदतीसाठी आवश्यक प्रस्ताव केंद्रसरकारकडे पाठवू, मात्र त्याकरता वाट न पाहता राज्यसरकार आपल्या पातळीवर उपाययोजना सुरु करेल असं महसूलमंत्र्यांनी सांगितलं. पीकविम्यासंदर्भात विमा कंपन्याबरोबर चर्चा करुन शेतकऱ्यांनी विम्याचा लाभ अधिकाधिक मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

महसूल प्रशासन गतिमान करण्यासाठी अपर जिल्हाधिकाऱ्यांची ११ पदं निर्माण करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. एसआयआर संदर्भात आरोप करण्याऐवजी सर्वच पक्षांनी मतदारयाद्यांची पडताळणी करावी, असं आवाहन बावनकुळे यांनी केलं.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या सिन्नर तालुक्यातल्या धोंड वीरनगर इथं कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज शेतपिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला. अपुऱ्या पावसामुळे पिकांचं झालेलं नुकसान, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि प्रत्यक्ष परिस्थितीची त्यांनी पाहणी करून माहिती घेतली. या अडचणीच्या काळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून नुकसानग्रस्तांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

राज्यातल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं तातडीनं किमान २ ते ३ दिवसांचं विधिमंडळाचं अधिवेशन घ्यावं आणि या परिस्थितीत काय पावलं उचलली जात आहेत, याची माहिती द्यावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. कार्यकर्त्यांनी ग्रामीण भागांत शेतकऱ्यांसाठी मदत केंद्रं सुरू करावीत, असं आवाहन त्यांनी केलं. शेतकऱ्यांचे प्राण कंठाशी आलेले असताना दुष्काळ जाहीर करण्यासाठी ५ ऑक्टोबरपर्यंत वाट पाहायचं कारण काय? कोणते निकष आणि कोणाची वाट सरकार पाहात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात यंदा पावसाची सुमारे २६ टक्के तूट नोंदवली गेल्यानं संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर 'ट्रिगर-१' लागू करण्याची शिफारस राज्य शासनाकडे करण्याचा निर्णय जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत घेण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत पर्जन्यमान, खरीप पिकांची स्थिती आणि पाणीटंचाईचा आढावा घेण्यात आला. कृषी विभागानं शेतकऱ्यांना प्रत्यक्ष शेतावर जाऊन तांत्रिक मार्गदर्शन करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

<><><><><>

मध्य प्रदेश सरकारकडून दिला जाणारा प्रतिष्ठित राष्ट्रीय लता मंगेशकर पुरस्कार प्रसिद्ध संगीतकार शंतनू मोईत्रा यांना जाहीर झाला आहे. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जयंतीनिमित्त इंदूर इथं येत्या सोमवारी होणाऱ्या कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. पाच लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

<><><><><>

जपानमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ६व्या दिवशी देखील भारतीय खेळाडूंनी विविध क्रीडा प्रकारात यशस्वी कामगिरी केली. या यशस्वी घोडदौडीबद्दल अधिक जाणून घेऊया, आमच्या प्रतिनिधी कडून.

**- - - व्हाईस कास्ट - - -**

*(आशियाई स्पर्धेच्या आजच्या दिवसाची सुरुवात वुशूमध्ये रोशिबिना देवीच्या रौप्यपदकाने झाली. महिलांच्या ६० किलो 'सांडा' प्रकारात रोशिबिना देवीने रौप्यपदक पटकावलं. अंतिम सामन्यात तिला चीनच्या झांग शियाओकडून पराभव पत्करावा लागला. आशियाई क्रीडा स्पर्धेतलं हे तिचं तिसरं पदक आहे.*

*नौकानयनात पुरुषांच्या डबल स्कल्स प्रकारात सतनाम सिंग आणि सलमान खान यांनी कांस्यपदक जिंकलं.*

*अनंतजीत सिंह नरूका आणि परीनाझ धालीवाल यांनी आज मिश्र स्कीट प्रकारात कांस्यपदक पटकावलं.*

*टेबल टेनिसमध्ये श्रीजा अकुला-सिंड्रेला दास आणि यशस्विनी घोरपडे-दिया चितळे या भारतीय जोड्यांनी उप-उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे.*

*पुरुष कबड्डीमध्ये भारतीय संघानं चिनी तैपेईच्या संघाला ३७ - २१ असं पराभूत करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. या गटात भारताचा हा सलग ४ विजय असून या विजयामुळे भारताचं पुरुष कबड्डीमधलं पदक निश्चित झालं आहे. महिला कबड्डी संघानं देखील इराणच्या संघाचा ३७-२३ असा पराभव केला. या संघाचा पुढचा सामना जपानबरोबर होणार आहे.*

*भारत या स्पर्धेत भारत १५ पदकांची कमाई करून पदकतालिकेत १३व्या स्थानावर आहे. यात १ सुवर्ण, ६ रजत आणि ८ कांस्य पदकांचा समावेश आहे.*

*राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आशियायी क्रीडा स्पर्धेत वेगवेगळ्या क्रीडाप्रकारात यश मिळवणाऱ्या खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे.)*

<><><><><>

यूसीआय जागतिक सायकलिंग अजिंक्यपद २०३२ या स्पर्धेचं यजमानपद पुणे भूषणवणार आहे. कॅनडात मॉन्ट्रियल येथे झालेल्या 'यूसीआय काँग्रेस'मध्ये हा निर्णय जाहीर करण्यात आला. २०३२च्या यजमान पदाच्या शर्यतीत कोलंबिया आणि मेक्सिको होते. मात्र उमेदवारी प्रकियेची अंतिम फेरी पुणे आणि नेदरलँड्समध्ये ग्रोनिंगेन यांच्यात झाली. पुण्याला सायकलिंगचं जागतिक केंद्र म्हणून विकसित करण्याच्या सामायिक उद्देशातून राज्य सरकार आणि अखिल भारतीय सायकल महासंघाने केंद्र सरकारच्या पाठिंब्याने ही बोली पूर्ण केली.

<><><><><>

अनंतचतुर्दशीच्या दिवशी उद्या मुंबईत विसर्जन मिरवणुकीसाठी गिरगाव चौपाटी परिसरात वाहतुकीच्या नियोजनाचा आराखडा बृहन्मुंबई महानगरपालिकेनं समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केला आहे. तसंच महानगरपालिकेनं तयार केलेल्या कृत्रिम तलावांची यादीही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पुण्यात उद्या विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस, होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाचे १० हजाराहून जास्त जवान तैनात करण्यात आले आहेत. शहरातल्या ४ प्रमुख मार्गांवरून ६३६ गणेश मंडळं या मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी सुमारे साडेतीन हजार सीसीटीव्ही कॅमेरे, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित व्हिडिओ विश्लेषण आणि चेहरा ओळख प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे.

//<><><><><>//